जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८२६ दिनांक - २२/११/२०२३**

वानवडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

## बी.टी.कवडे रोड येथे सोनारावर पिस्टलमधुन फायरींग करुन त्यांना गंभीररित्या जखमी करुन त्यांचेकडील बॅग हिसकावुन नेणा-या दिल्ली येथील आंतरराज्यीय आरोपीना वानवडी तपास पथकाने केले जेरबंद,

वानवडी पोलीस ठाणे गु.र.नं.५४४/२०२३ भा.दं.वि कलम ३९७,३४१,३४,आर्म ॲक्ट ३(२५),२७ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे दाखल गुन्हयातील फिर्यादी व त्यांचा मुलगा यांचे सय्यदनगर हडपसर पुणे येथे नाकोडा ज्वेलर्स नावाने दुकान आहे. दि. ०८/११/२०२३ रोजी रात्री त्यांचे दुकान बंद करुन, ते दोघेही त्यांचेकडील बॅगेत कामासाठी आलेले दोन तोळे सोन्याचे दागीने आणि रोख रक्कम १०,०००/-रुपये हे घेवुन त्यांचे मुंढवा येथील राहते घरी जात असताना, जयसिंग ससाणे उद्यान, बी.टी. कवडे रोडवर या ठिकाणी एका काळे रंगाचे मोटार सायकलवरुन तीन अनोळखी इसम आले. त्यांनी फिर्यादी व त्यांचे मुलाचे गाडीस त्यांची गाडी आडवी लावुन थांबविले. फिर्यादी यांचे मुलाचे हातातील बॅग हिसकावण्याचा प्रयत्न केला असता, मुलाने विरोध केला. त्यावेळी सदरचे इसमांनी त्याचेकडील गावठी पिस्टलने मुलगा याचेवर दोन्ही पायावर व गालावर फायर करुन त्यांना गंभीररित्या जखमी करुन त्यांचेकडील दागिने व पैशाची बॅग हिसकावुन घेवुन पोबारा केला.

गुन्हा दाखल झाले नंतर वानवडी पोलीस ठाणेचे तपास पथक, तपासी अधिकारी तसेच गुन्हे शाखा युनिट -५ चे अधिकारी कर्मचारी यांनी तांत्रीक पध्दतीने तसेच रेखाचित्राचे आधारे तपास सुरु केला. तपास करत असते वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय पंतगे यांना गुन्हयातील आरोपीत हे घटना घडल्यानंतर दिल्ली येथे गेले असल्याची पक्की खबर मिळाली. मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ -५, पुणे शहर यांचे मार्गदर्शन व सुचना प्रमाणे तत्काळ पुढील उपाय योजना करण्यात आल्या. व त्या प्रमाणे वानवडी पोलीस ठाणेचे तपास पथकातील पो उप निरी संतोष सोनवणे, व स्टाफ यांना दिल्ली येथे रवाना केले व पोलीस अंमलदार अतुल गायकवाड, अमोल जाधव यांनी यांचेकडील सीडीआर तांत्रिक विश्लेषण व्दारे गुन्हयातील तीन मारेकरी आरोपी नामे **१) बिलाल अहमद असदअली त्यागी, वय. ३४ वर्षे, रा. फ्लॅट नं. १०२, डी/३६, गल्ली नं. १७,रिशिकरदन मार्ग, सिलमपुर, उत्तर पुर्व दिल्ली, दिल्ली ११००५३ मुळ पत्ता - पुराणी घासमंडी, हंडीया मुहल्ला, घर नं. २१४,सीवीलाईन पोलीस ठाणे, मुजफ्फरनगर, उत्तरप्रदेश, २) हनी जीते वाल्मिकी, वय. २६ वर्षे, धंदा. काहीनाही, रा बी-९७८,आंबेडकर बस्ती, आर के पुरम, सेक्टर-१, साऊथ वेस्ट दिल्ली, दिल्ली व ३) सागर राज कुमार, वय. २६ वर्षे, धंदा. शेती, रा. घर नं. १९०, वाल्मीकी मुहल्ला, राणापाना, कुतबगड, नॉर्थ वेस्ट दिल्ली,** यांना ताब्यात घेतले. त्यांना अटक करुन मा. न्यायालयात हजर केले असता, दि. २३/११/२०२३ रोजीपर्यंत पोलीस कस्टडी मंजुर केलेली आहे. तपासाअंती सदर मारेकरी आरोपीत यांचेकडुन दोन पिस्टल, एका बुलेटची खाली केस, दुचाकी स्प्लेन्डर गाडी असे मिळुन एकुण रू.१,३०,०००/- रूपयांचा ऐवज हस्तगत करणेत आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री पाटणकर वानवडी पोस्टे हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशीक विभाग, पुणे शहर श्री रंजनकुमार शर्मा, मा. पोलीस उपआयुक्त परि.-५, पुणे शहर श्री विक्रांत देशमुख, व मा. सहा. पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे शहर श्री शाहुराजे साळवे यांचे मार्गदर्शनाखाली वानवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री.संजय पतंगे, पोलीस निरिक्षक (गुन्हे) श्री.विनय पाटणकर व तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक संतोष सोनवणे, पोलीस अंममदार अजय केसरकर, अमजद पठाण, संतोष नाईक, अतुल गायकवाड,हरिदास कदम, महेश गाढवे, संदिप साळवे, विष्णु सुतार, निलकंठ राठोड, यतीन भोसले, राहुल माने, विठ्ठल चोरमले, अमोल गायकवाड व सोनम भगत यांनी केली आहे.

